# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/ ४०/२०१४-१५/१५३ दिनांक : २२.०८.२०१४

**<u>आदेश केस क्र.४०/१४-१५</u>**

| | |
|---|---|
| श्री.इकबाल बंदेनवाज नदाफ,<br>रा.व्हसपेठ,ता.जत,<br>जिल्हा - सांगली. | अर्जदार |
| **विरुध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, सांगली. | |
| २) कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठेमहांकाळ. | विरुध्द पक्षकार |
| ३) उपकार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उपविभागीय कार्यालय, संख. | |

**कोरम:-** १. श्री.बी.जी.पवार,अध्यक्ष
२. श्री.जी.बी.पानकर, सदस्य सचिव
३. श्री.जी.सी.लेले,सदस्य

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**
**(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)**
**विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार**

**<u>न्याय निर्णय</u>**

श्री.बी.जी.पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री.इकबाल बंदेनवाज नदाफ,रा. व्हसपेठ,ता.जत,जिल्हा-सांगली, यांनी वितरण कंपनीचे विभागीय कार्यालय,कवठेमहांकाळ,शा.का.संख, यांचेविरुध्द दि.२५०६.२०१४ रोजी मंचाकडे गा-हाणे दाखल केले. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

ग्राहकाने आपल्या शेतीजमीन गट क्र.६५१ मध्ये ३ अश्वशक्ती नवीन शेतीपंप वीज कनेक्शनसाठी दि.२५.०३.२०१३ रोजी अर्ज केलेला आहे. त्या अर्जाची पोच ग्राहकाकडे आहे. कृति मानंके विनियमातील तरतुदीनुसार वितरण वाहिनीचा विस्तार असल्याने अर्जदारास एक महिन्यात म्हणजे दि.२४.०४.२०१३ रोजी चलन देणे आवश्यक होते. अंतर्गत कक्ष,सांगली येथे दि.०७.५.२०१४ रोजी गा-हाणे दाखल केले. चलन देण्याचा आदेश व्हावा व विलंब निश्चित झाल्यास भरपाई मिळावी. त्यानंतर ४ जून,२०१४ रोजी चलन दिले. विलंब निश्चित झाल्यास कृति मानंकेनुसार भरपाई मिळावी असे सांगितले.

वितरण कंपनीने आपल्या दि.२०.०८.२०१४ च्या लेखी अहवालात ग्राहकाचा दि.२५.०३.२०१३ रोजी अर्ज मिळाल्याचे मान्य केले. उपविभाग संख यांनी दि.१०.०४.२०१३ रोजी शाखा कार्यालय, दरिकोणूर येथे पाठविला. तेथे तो प्रलंबित राहून अंदाजपत्रकासहित संख उपविभाग येथे दि.३१.०५.२०१४ रोजी प्राप्त झाला. दि.४.६.२०१४ रोजी मंजुरी मिळाली. ग्राहकाने चलन भरले आहे. दरिकोणूर शाखा कार्यालयाच्या अधिका-यांना दि.०४.१२.२०१२ ते ३१.१२.२०१३ पर्यंत शाखा कार्यालय,माडग्याळ, याचा अतिरिक्त कारभार दिला असल्याने श्री.नदाफ यांच्या अर्जास विलंब झाला. या कारणास्तव विलंबाची मागणी फेटाळावी.

प्रस्तुत तक्रारीची आज दि.२१.०८.२०१४ रोजी सुनावणी झाली. ग्राहकाचे प्रतिनिधी श्री.हरिभाऊ खापरे व वितरण कंपनीतर्फे कार्यालयीन अधिकारी श्री.पाटील उपस्थित होते. श्री.खापरे यांनी ग्राहकाने दि.२५.०३.२०१३ रोजी अर्ज दिल्याचे सांगितले. त्यानुसार सदर चलनाची रक्कम भरल्याचे वितरण कंपनीने मान्य केले. लघुदाबवाहिनी उभी करावी लागत असल्यामुळे कृती मानंकानुसार १ महिन्यांत चलन देणे आवश्यक होते. त्यासाठी निश्चित विलंब झालेला आहे. दिलेली विलंबासाठीची कारणे योग्य नाहीत. ठराविक मुदतीत वीज जोडणी दिल्यास ग्राहक विलंबापोटीची भरपाईची मागणी सोडून देण्याचे सांगितले. वितरण कंपनीच्या स्थानिक अधिका-यांनी त्यास असमर्थता दर्शविली. कारण नोव्हेंबर,२०१२ पर्यंत पैसे भरलेल्याय शेतक-यांना वीजपुरवठा दिला असून सन १३-१४ व १४-१५ची कामे इन्फ्रामार्फत करण्यात येणार आहे. त्यामुळे वीजजोडणी देणे अशक्य आहे. तक्रारदाराची चलन देण्यात झालेल्या विलंबापोटी भरपाई देणेची प्रमुख मागणी आहे. वितरण कंपनीने आपल्या लेखी अहवालात दिलेली कारणे योग्य व संयुक्तिक नाहीत. वरचेवर एका कार्यालयाचा अधिभार दुस-या शाखा कार्यालयाकडे असल्याने अर्जदारास चलन देण्यास झालेला विलंब क्षमापित किंवा माफ होत नाही. कृती मानंकेतील विनियमात अशी तरतुद नाही. तक्रारदारास विलंबापोटी मागितलेली भरपाई मंजुर करण्यात येत आहे.

# आदेश

१. तक्रार मंजुर करण्यात येत आहे.

२. वितरण कंपनीने ग्राहकास कृती मानंके विनियमानुसार प्रति आठवडा रु.१००/- ची भरपाई दि.२५.०४.२०१३ पासून दि.०४.६.२०१४ या कालावधीसाठी मंजुर करण्यात येत आहे. सदरची रकमेचे समायोजन कृती मानके विनियम रुल १२.२ नुसार ग्राहकाच्या बिलातून करण्यात यावी व तसा अहवाल मंचास द्यावा.

३. सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४. या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

सही/-
(बी.जी.पवार)
अध्यक्ष

श्री.जी.बी.पानकर, सदस्य सचिव .. सही/-

श्री.जी.सी.लेले, ग्राहक सदस्य .. सही/-

एकमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.